www.sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ५० • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.२८ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# सरकार ५ वर्षांत २५ हजार 'लालपरी' घेणार; गाव तिथे नवी एसटी धावणार

## अर्थमंत्र्यांनी मान्यता दिल्याची परिवहन मंत्र्यांची माहिती

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्य सरकार पुढील ५ वर्षांत २५ हजार स्वमालकीच्या लालपरी बसेस खरेदी करणार असल्याची राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी दिली. सरकारच्या या निर्णयामुळे गाव तिथे नवी एसटी धावेल, तसेच मागेल त्याला बस फेरी मिळेल, असे ते म्हणाले. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सोमवारी २०२५-२६ च्या अर्थसंकल्पासाठी परिवहन विभागाची आढावा बैठक बोलवली होती. या बैठकीत एसटीच्या सद्यस्थितीची परिस्थिती मंत्री सरनाईक यांनी विषद केली. त्यानुसार सध्या एसटी महामंडळाकडे केवळ १४ हजार ३०० बसेस आहेत. त्यापैकी १० हजार बसेस १० वर्षांपेक्षा जास्त जुन्या आहेत. या बस पुढील ३-४ वर्षांत प्रवासी सेवेतून बाद होतील.

ही वस्तुस्थिती लक्षात घेता भविष्यात एसटीला आत्मनिर्भर होण्यासाठी स्वतःच्या बसेस घेणे आवश्यक आहे. त्यासाठी दरवर्षी ५ हजार नवीन लालपरी बसेस याप्रमाणे पुढील ५ वर्षांमध्ये २५ हजार लालपरी बसेस घेण्याची पंचवार्षिक योजना आम्ही आखली आहे. त्याला अर्थमंत्र्यांनी परवानगी द्यावी असा प्रस्ताव मांडला. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी बसेसची गरज लक्षात घेऊन तातडीने या प्रस्तावाला तत्वतः मान्यता दिली. अर्थमंत्र्यांनी यासंबंधीचा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करण्याची सूचना परिवहन विभागाला केली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यावेळी बोलताना म्हणाले की, या योजनेंतर्गत दरवर्षी ५ हजार नव्या बस घेतल्या जातील. २०२९ साली एसटीकडे २५ हजार बस व ५ हजार इलेक्ट्रिक बस याप्रमाणे ३० हजार बसेसचा स्वतःच्या मालकीचा ताफा उपलब्ध असेल. यामुळे भविष्यात गाव तिथे एसटी... मागेल त्याला बस फेरी..! उपलब्ध करून देता येईल. आज आनंद दिघे साहेबांच्या जयंती निमित्त अजित पवारांनी २५ हजार स्वमालकीच्या लालपरी बसेस घेण्याच्या प्रस्तावाला तत्वतः मान्यता देऊन एसटीवर प्रेम करणाऱ्या लाखो सर्वसामान्य जनतेला गोड भेट दिली आहे, असे ते म्हणाले



## स्व.दशरथ तिवरे प्रतिष्ठानकडून प्रजासत्ताक दिनानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप



**ठाणे । प्रतिनिधी**

स्व. दशरथ तिवरे प्रतिष्ठानच्या वतीने प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने नडगाव विभागातील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना वह्या व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शहापूर तालुक्यातील सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेत प्रतिष्ठानने टेंभरे, चिंचवली, मासवणे, लेनाड, कळगाव, नडगाव, अंबीवली, बावघर इत्यादी गावांतील शाळांतील शेकडो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दिले.

या उपक्रमात प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेश तिवरे व अन्य पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरला आहे.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त गोपालकृष्ण गणेश मंडळाचे भव्य रक्तदान शिबीर



**वरोरा । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे, गोपालकृष्ण गणेश मंडळाने प्रजासत्ताक दिनानिमित्त द्वारका नगरी येथील हनुमान मंदिरात भव्य रक्तदान शिबीर, मोफत डोळे तपासणी आणि आरोग्य तपासणीचे आयोजन केले. नागपूर येथील जीवन ज्योती ब्लड बँक, तसेच आरोग्य तपासणीसाठी वरोऱ्याचे डॉ. आकिब शेख, डॉ. चीवंडे (आर्थोपेडिक), आणि डॉ. शेंडे (डोळे तपासणी) उपस्थित होते.या शिबिरात ६० पुरुष आणि १२ महिलांनी रक्तदान केले, तर शेकडो नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

कार्यक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष सचिन नाखले, राहुल नन्नावरे, तुषार कडू, गणेश पागरुत, नवोदय धोबे, प्रशांत देशमुख, अतुल नन्नावरे, अंकुश खंडाले, राम टोंगे, आणि मंगेश पुसदेकर उपस्थित होते. परिसरातील नागरिकांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## उद्धव ठाकरे देवेंद्र फडणवीसांमध्ये छुपी रणनीती

## लवकरच भाजपसोबत दिसल्यास संजय राऊतांना झटका बसेल, रवी राणा यांचा दावा

**अमरावती (वृत्तसंस्था)**

युवा स्वाभिमान पक्षाचे आमदार रवी राणा यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. उद्धव ठाकरे यांची देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मोठ्या प्रमाणात छुपी रणनीती सुरू आहे. संजय राऊत यांना कल्पना नाही. ते आधी सुद्धा अंधारात होते आणि आता सुद्धा ते अंधारात आहेत, असा टोला रवी राणा यांनी लगावला आहे. उद्धव ठाकरे येत्या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व स्वीकारतील, असा खळबळजनक दावाही रवी राणा यांनी केला. विधानसभा निवडणुकीतल्या पराभवानंतर ठाकरे गटाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. यावरुनच ठाकरे भाजपच्या जवळ येण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा केला जातोय. आदित्य ठाकरे



यांनीही मुख्यमंत्री फडणवीस यांची तीन वेळा भेट घेतली होती. यावरुनच जोरदार चर्चा सुरु झाली. आता भाजच्या मित्रपक्षाने मोठा दावा केल्यानंतर सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. उद्धव ठाकरे यांची देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मोठ्या प्रमाणात छुपी रणनीती सुरू आहे. पण संजय राऊत यांना त्याची कल्पना नाही. ते आधी सुद्धा अंधारात होते आणि आता सुद्धा ते अंधारात आहेत, असे रवी राणा म्हणाले. देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत. त्यांचे नेतृत्व उद्धव ठाकरे येणाऱ्या काळात स्वीकारतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे देखील नेतृत्व उद्धव ठाकरे येणाऱ्या काळात स्वीकारणार आहेत. त्या दृष्टीने त्यांचे पाऊल टाकणे सुरु असल्याचा दावा रवी राणा यांनी केला.

## अंबादास दानवे पोलिसांच्या ताब्यात:एसटी भाडे वाढीविरोधात ठाकरे गट आक्रमक;संभाजीनगर जिल्ह्यात चक्काजाम आंदोलन

**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा स्थापन झालेल्या महायुती सरकारने एसटी महामंडळाच्या तिकीट दरामध्ये वाढ केली आहे. या निर्णयाविरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने राज्यभरात आंदोलन करण्यात येणार आहे. मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजता राज्यातील प्रमुख एसटी डेपोजवळ हे चक्काजाम आंदोलन होणार आहे. या माध्यमातून एसटी भाडे वाढीविरोधात ठाकरे गट चांगलाच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आजच चक्काजाम आंदोलन करण्यात आले. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्त्वात हे आंदोलन झाले. या आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

राज्यातील सर्वसामान्य जनतेला एसटी महामंडळाने केलेली भाडेवाढ परवडणारी नाही. दुसरीकडे तुम्ही वायफळ खर्च करत आहात आणि एसटीची भाडे वाढ करता?



असा प्रश्न दानवे यांनी उपस्थित केला. त्यामुळे एस टी महामंडळाने केलेली भाडेवाढ रद्द करणेच योग्य होईल. नसता ही सर्वसामान्य प्रवाशांवर अन्यायकारक असा हा निर्णय असेल, असे देखील दानवे यांनी म्हटले आहे. अजित पवार हे देखील भाडेवाडीच्या विरोधात बोलत आहेत. तर मग अशावेळी ते अर्थमंत्री आहेत, त्यांनी भाडेवाढ रद्द करावी, अशी मागणी त्यांनी केली. परिवहन मंत्री भाडेवाढ झालेले मलाच माहीत नसल्याचे सांगत आहेत. मग सरकारमध्ये ताळमेळ नसल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे. महाराष्ट्रातील जनता आधीच महागाईने त्रस्त झाली आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या खिश्यावर एसटी महामंडळाच्या भाडेवाडीतून आणखी ताण पडणार आहे, असा आरोप उद्धव ठाकरे गटाने केला आहे. एसटी महामंडळाने तिकिटाच्या दरामध्ये १४.९७ टक्के एवढी भाव वाढ केली आहे. या विरोधामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये आज ठाकरे गटाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. तर उद्या राज्यभर आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती देखील पक्षाच्या वतीने देण्यात आली आहे.

एस टी महामंडळाच्या वतीने एसटी बसच्या तिकिट दरामध्ये करण्यात आलेल्या दरवाढीला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाने केला आहे. या संदर्भात त्यांना प्रश्न विचारले असता अधिकाऱ्यांनी भाडेवाडीचा निर्णय परस्पर घेतला असल्याचा दावा त्यांनी केला होता. त्यामुळे एसटी भाडेवाढ लागू झाली तरी परिवहन मंत्र्यांना त्याची साधी कल्पनाही नव्हती का? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाने उपस्थित केला आहे. २५ तारखेच्या मध्यरात्रीपासून राज्यभरात ही दरवाढ लागू झाली आहे.

## सुनील तटकरे यांना जिल्ह्यात फिरू देणार नाही

## पालकमंत्रिपदाचा वाद विकोपाला,भरत गोगावले समर्थक आमदार आक्रमक

**रायगड (वृत्तसंस्था)**

रायगड जिल्ह्यातील पालकमंत्रिपदावरून सुरू झालेला वाद हा आणखी विकोपाला जाताना दिसत आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र साळवी यांनी खासदार सुनील तटकरे यांना जिल्ह्यात फिरू देणार नाही, असा इशाराच दिला आहे. तसेच आता तटकरे यांच्या विरोधात एकच मोहीम सुरू झाली आहे ती म्हणजे तटकरे हटाव मोहीम, अशा शब्दात महेंद्र साळवी यांनी हल्लाबोल केला आहे.

अलिबाग येथील कुसुंबळे येथे स्वर्गीय प्रमोद केशव ठाकूर प्रवेशद्वार नामकरण सोहळा पार पडला. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांनी सुनील तटकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. यात प्रामुख्याने आमदार महेंद्र साळवी यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळत आहे.

आमदार महेंद्र साळवी म्हणाले, एकनाथ शिंदेंसमोर आम्ही आमची कैफियत मांडली आहे. भरत गोगावले यांचे पालकमंत्रिपदाच्या रेस मधील नाव गायब होऊन आदिती तटकरे यांचे टाकण्यात आले. प्रोटोकॉलनुसार पालकमंत्रिपद हे भरत गोगावलेनाच मिळायला हवे होते. मात्र तटकरे यांनी गोगावले यांचे नाव यादीतून हटवण्यासाठी त्यांची जादू चालवली. यादीतून नाव गायब करणे हा तटकरे यांचा स्वभाव आहे. सुनील तटकरे यांना गोगावले हे मंत्री झाले तर पालकमंत्री निश्चित होणार हे माहीत झाल्यानेच त्यांनी पालकमंत्री पद त्यांच्याकडे खेचून आणले. मात्र आमच्या आक्रोशानंतर मुख्यमंत्र्यांनी यावर स्थगिती आणली. आम्ही आता आशावादी आहोत की येणाऱ्या चार दिवसात भरत गोगावले पालकमंत्री होतील.

पुढे बोलताना महेंद्र साळवी म्हणाले, भरत गोगावले यांचे नाव यादीतून वगळल्यानंतर रायगडमध्ये मोठा उठाव झाला. हा आमचा आणि लोकांचा उद्रेक आहे. गोगावले हे पालकमंत्री पदाचे दावेदार असतानासुद्धा तटकरेंनी आपल्या झोळीतच दान टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र आता कधीच असे होणार नाही. कारण सुनील तटकरे यांची झोळी फाटली आहे. आता जे काही दान पडेल ते भरत गोगावले यांच्या झोळीतच पडेल.सुनील तटकरे यांच्यावर टीका करताना महेंद्र साळवी म्हणाले, सुनील तटकरे यांचा पूर्व इतिहास महाराष्ट्राला माहीत आहे.

## बहुमताच्या हवेत उडणाऱ्या सरकारने थोडे जमिनीवर यावे;नसता सरकारला शेतकरी भरडल्याशिवाय राहणार नाही-रोहित पवारांची टीका

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्य सरकारमधील गोंधळामुळे राज्यांमध्ये बहुतांश ठिकाणी तूर खरेदी केंद्र अद्याप सुरु होऊ शकते नाही, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना एक हजार कोटींचा फटका बसला असून शेतकऱ्यांच्या तोंडातील घास हिसकावला गेला असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे बहुमताच्या हवेत उडणाऱ्या राज्य सरकारने थोडे जमिनीवर येऊन गंभीरता दाखवत तूर खरेदी सुरू करावी, अशी मागणी देखील आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावरील पोस्ट माध्यमातून राज्य सरकारवर टीका केली आहे. राज्य सरकारने या संदर्भातला निर्णय लवकर घ्यावा, अन्यथा राज्यातील शेतकरी सरकारला भरडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे. राज्य सरकारच्या चुकांमुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी भरडला गेला असल्याची टीका देखील आमदार रोहित पवार यांनी केली आहे

या संदर्भात आमदार रोहित पवार आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, एकीकडे केंद्राने तुरीच्या मुक्त आयातीला मुदतवाढ दिल्याने तुरीचे दर हमीभावापेक्षा खाली कोसळले आहेत तर दुसरीकडे राज्य सरकारच्या गोंधळामुळे बहुतांश ठिकाणी तूर खरेदी केंद्र सुद्धा सुरु होऊ शकलेली नाहीत, परिणामी राज्यातल्या शेतकऱ्यांना तब्बल १००० कोटीचा फटका बसला असून पुन्हा एकदा ऐन मोक्यावर शेतकऱ्यांच्या तोंडातला घास हिसकावला जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या चुकांमुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी जसा भरडला गेला तशीच स्थिती तुरीच्या बाबतीत सुद्धा होताना दिसत आहे. त्यामुळे बहुमताच्या हवेत उडणाऱ्या राज्य सरकारने थोडं जमिनीवर येऊन किमान आता तरी थोडे गांभीर्य दाखवत तूर खरेदी सुरळीत करावी. अन्यथा या सरकारला शेतकरी भरडल्याशिवाय राहणार नाही.

देशातच यंदा तुरीची लागवड १४ टक्क्यांनी वाढली आहे. यात महाराष्ट्रातील लागवडीचा देखील समावेश आहे. राज्यातील लागवडी क्षेत्रात झालेल्या वाढीमुळे यंदा राज्यात तूर उत्पादन वाढीचीही अंदाज वर्तवला जात आहे. त्यामुळे नवीन तूर बाजारात दाखल होण्याच्या आधीच बाजारात तुरीचे भाव पडले आहेत. मागील दीड महिन्यातच तूर दरामध्ये अडीच हजार रुपयांनी घसरण झाली आहे. त्यामुळे चांगला भाव पाहून तुरीची लागवड केलेल्या शेतकऱ्यांची चिंता वाढली.

महाराष्ट्रात तूर खरेदीवरुन गोंधळ सुरु असतानाच दुसरीकडे कर्नाटकात आगाप लागवडीची तूर बाजारात येत आहे. पण बाजारभाव नसल्याने कर्नाटक सरकारने आपल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हमीभावाने तूर खरेदीचा निर्णय घेतला आहे. कर्नाटक ३ लाख ६ हजार टन खरेदी करणार आहे. शिवाय या तुरीला ४५० रुपये बोनसही देणार आहे. त्यामुळे कर्नाटकातील शेतकऱ्यांना किमान ८ हजार रुपये प्रतिक्विंटलचा भाव मिळणार आहे. महाराष्ट्र सरकार आजही सोयाबीन खरेदीचा तिढा सोडवण्यातच गुंतले आहे. यंदा तूर उत्पादकांना चांगला दर मिळाला नाही तर पुढच्या हंगामात शेतकरी लागवडी कमी करतील, असे शेतकरी सांगत आहेत



# राहुरी-मांजरी रस्त्याची साडेसाती संपता संपेना



**राहुरी । प्रतिनिधी**

रस्त्याची अत्यंत दयनिय अवस्था; रस्त्याला वेढले खड्ड्यांनी; प्रवास करणे बनले जिकरीचे राहुरी तालुक्यातील पूर्वभागाच्या दळणवळणाच्या दृष्टिने महत्त्वाचा असणाऱ्या राहुरी-मांजरी या रस्त्याची अनेक दिवसापासून अत्यंत दयनिय अवस्था झाली असून रस्त्यावर मोठमोठ्या खड्डे पडलेले तर प्रवास करणे जिकरीचे बनले आहे. त्यामुळे राहुरी-मांजरी रस्त्याची साडेसाती संपता संपत नसल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

राहुरी-मांजरी रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांमधून केली जात आहे. राहुरी ते मांजरी रस्त्याच्या कामात आतापर्यंत केवळ मलमपट्टी करून प्रवाशांची दिशाभूल केली आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहनधारकांसाठी हा रस्ता डोकेदुखी ठरत आहे. हा दोन्हीही बाजूने काटेरी झुडुपाच्या विळख्यात सापडला असून अनेकदा अरुंद रस्त्यामुळे अपघातही झाले आहेत. हा रस्ता राहुरी व नेवासेला जोडणारा जवळचा रस्ता म्हणून या रस्त्यावर नेहमीच वर्दळ असते. त्याचप्रमाणे राहुरी तालुक्यातील तांदूळवाडी, आरडगाव, कोंढवड, शिलेगाव, मानोरी, वळण, केंदळ, मांजरी तसेच नेवासा तालुक्यातील पानेगाव आदी गावांतील जनतेची, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची रस्त्यावरून रहदारी सुरू असते. या रस्त्याच्या अवस्थेमुळे अनेक अपघातही घडले आहेत. त्यात अनेकांना आपला प्राणही गमवावा लागला आहे. त्यामुळे आणखी किती बळी घेणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. राहुरी-मांजरी रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अनेकांच्या वाहनांचा खिळखिळा झाला असून वाहन चालकांचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे सार्वजनिक लोकप्रतिनिधींनी राहुरी-मांजरी बांधकाम तात्काळ रस्त्याची दुरुस्ती करून नागरिकांसह प्रवाशांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# माय छोटा स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; चिमुकल्यांनी दिला देशभक्तीचा संदेश



**नागपूर । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिन हा दिवस भारताच्या ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण दृष्टीकोनातून अत्यंत विशेष आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने आपले संविधान स्वीकारले आणि एक गणतंत्र देश म्हणून उभा राहिला. ह्या दिवशी माय छोटा स्कूलने आपल्या विद्यार्थ्यांसोबत प्रजासत्ताक दिन धुमधडाक्यात साजरा केला आणि देशभक्तीचा गोड संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात तिरंग्याला मानवंदना देऊन करण्यात आली. माय छोटा स्कूलच्या संचालिका चेतना खंडाळे यांनी या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. त्या म्हणाल्या, प्रजासत्ताक दिन हा आपल्या देशाच्या सार्वभौमत्वाची जाणीव करतो. आपण सर्व एकत्र येऊन या देशाच्या प्रगतीसाठी काम करूया, ज्यामुळे भारत एक महान राष्ट्र म्हणून उभा राहील.

कार्यक्रमास अध्यक्षस्थानी संचालिका चेतना खंडाळे प्रमुख पाहुण्यांच्या रूपात सह संचालिका अवनी खंडाळे, शिक्षिका नंदिनी जांभुळकर, हेमलता बारापात्रे, उत्कर्ष रामटेके, आणि पल्लवी गायधाने उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व आणि त्यातील मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले.

प्रजासत्ताक दिनाच्या उत्सवात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यात देशभक्तीपर नृत्य, वेशभूषा स्पर्धा, आणि वक्तृत्व स्पर्धांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीच्या प्रतीकांमध्ये वेशभूषा घालून आपल्या कलेचे प्रदर्शन केले. गुणिका धंदे, नाव्या निमजे, आणि अर्शिका वाजे यांसारख्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत प्रावीण्य मिळवले.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर भाषणे देऊन प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. ध्रूवा गंडलेवार, शिवांश नाईक, मानवी भोसले, सुयास ठाकरे, आणि आराध्या जुमले यांना यामध्ये प्रावीण्य मिळाले.

देशभक्तीपर नृत्य स्पर्धा: भार्गवी बावरे, पृथ्विक निमजे, आणि शिवांश सोनारे यांसारख्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य सादर करत उत्कृष्ट प्रदर्शन केले.

ओम रखुंडे, अधिराज गायकवाड, आडविक हटवार, सान्वी जाईन, इशान जाईन, इशिका देऊळकर, आणि श्रीजा जाधव यांनी समूह नृत्यात अप्रतिम प्राविण्य दाखवले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी गायधाने यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी, पल्लवी कोरडे यांनी आभार व्यक्त केले.

या विविध स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी देशभक्तीचा संजीवक संदेश दिला आणि प्रजासत्ताक दिनाच्या ऐतिहासिक महत्त्वाची जाणीव सर्वांना दिली. माय छोटा स्कूलने प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्साह आणि उत्सर्ग पहात, शालेय जीवनातील एक प्रेरणादायी पर्व साकारले

# रंगनाथ (आप्पा) लोंढे यांची संजीवनीचे जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती



**कोपरगाव । प्रतिनिधी**

संजीवनी उद्योग समूहात १९८९ पासून सेवा देणारे आणि स्व. शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करत असलेले रंगनाथ (आप्पा) लोंढे यांची जनसंपर्क अधिकारी (पब्लिक रिलेशन ऑफिसर) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

संजीवनी उद्योग समूहाचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांनी उभारलेल्या या समूहाचा आज वटवृक्ष झाला असून, अनेकांना येथे आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे. स्व. कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली आणि बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे, व युवानेते विवेक कोल्हे यांच्या सहकार्याने लोंढे यांनी नागरिकांना मार्गदर्शन, माहिती, आणि सहकार्य पुरवले आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेत त्यांना जनसंपर्क अधिकारी पदाची जबाबदारी देण्यात आली. लोंढे हे सर्वसामान्य कुटुंबातून येऊन आपल्या मितभाषी व सुसंस्कृत वर्तणुकीमुळे कोल्हे कुटुंबाचे विश्वासू प्रतिनिधी म्हणून ओळखले जातात. सरकारी, निमसरकारी, व राजकीय क्षेत्रांमध्ये त्यांची पकड मजबूत असून, त्यांच्या कार्यशैलीने अधिकाऱ्यांपासून सर्वसामान्यांपर्यंतचा जनसंपर्क मजबूत झाला आहे.

युवानेते विवेक कोल्हे यांनी लोंढे यांना दिलेल्या या संधीबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केला असून, नव्या जबाबदारीचे कार्य समर्थपणे पार पाडण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. स्व. शंकरराव कोल्हे यांची तळमळ व मार्गदर्शन ही माझ्या जीवनातील मोलाची शिकवण आहे. मी ही नवीन जबाबदारी त्यांच्या प्रति समर्पित करत आहे, असे लोंढे यांनी सांगितले.

लोंढे यांच्या नियुक्तीबद्दल संजीवनी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे, सहकार महर्षी कोल्हे कारखाना संचालक मंडळ व इतर अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले असून, त्यांचे सर्व स्तरांवर कौतुक होत आहे.

# तहसीलदार यांचे हस्ते शेतकरी विशिष्ट ओळखपत्र क्रमांकाचे प्रमाणपत्राचे वितरण

**भद्रावती । प्रतिनिधी**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून तहसिल कार्यालयात तहसीलदार राजेश भांडारकर यांचे हस्ते तालुक्यातील चीचोर्डी येथील शेतकरी दिलीप मांढरे यांचेसह अनेक शेतकऱ्यांना केंद्र शासन व राज्य शासनाच्या ग्री स्टॉक योजनेंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांकाच्या प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. केंद्र व राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला ग्री स्टॉक संकल्पनेच्या शेतकरी ओळखपत्र क्रंमाक निर्मिती प्रक्रियेत गतिमान करण्यासाठी शासनाच्या अँग्रिस्टॉक सुकाणू समितीने ९ जानेवारी रोजी संपूर्ण राज्यात नागरी सुविधा केंद्र (सीएससी) ची मदत घेऊन शेतकरी ओळख क्रंमाक निर्मितीचा निर्णय घेतलेला आहे.शेतक-यांच्या अंत्यंत फायदयाचा असा हा प्रकल्प आहे. यापुढे प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ दयायचा असेल तर शेतकरी ओळख क्रमांक आवश्यक आहे. केंद्रशासन व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्यासाठी



शेतकरी ओळख क्रमांक हा मूलभूत घटक राहणार आहे. शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप, तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकयांना मिळवणारी नुकसान भरपाईची अनुदानाची रक्कम याच विशिष्ट ओळखपत्र फार्मर आयडी च्या माध्यमातून लाभ मिळणार आहे. याच संकल्पनेतून २६ जानेवारीला भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमीत्ताने तहसिल कार्यालय भद्रावती येथे ग्री स्टॉक योजने अंतर्गत तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना तहसीलदार राजेश भांडारकर यांचे हस्ते फार्मर आय डी शेतकरी विशिष्ट ओळखपत्र क्रमांक प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी दिलीप मांढरे, दिलीप नागपुरे,प्रकाश घोडमारे, मनोहर पतरंगे,संतोष नागपुरे,वनवास शेंडे चोरा, रवी खाडे,नंदोरी व भद्रावती तालुक्यातील अन्य शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.सदर कार्यक्रमाला ठाणेदार अमोल काचोरे, नायब तहसिलदार मनोज आकनूरवार, राहुल राऊत, सुधीर खांडरे, नायब तहसीलदार पठाण, माजी आमदार बाळासाहेब साळुंखे, माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, अफजल भाई, तहसील कार्यालयाचे कर्मचारी, तालुक्यातील शेतकरी बांधव तथा प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीमार्फत- पालकमंत्री संजय सावकारे यांचा सत्कार



**भंडारा । प्रतिनिधी**

३५ वर्षांपासून संविधान जागर हा उपक्रम म.अनिस च्या वतीने महाराष्ट्रत सुरु आहे. पालकमंत्री संजय सावकारे भंडाऱ्यात आले असता, त्यांच्या स्वागतासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृतमहोत्सवानिमित्त विश्राम गृह भंडारा येथे भारतीय संविधानाचे पुस्तक आणि समितीचे अंक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.


या कार्यक्रमात भंडारा-गोंदिया क्षेत्राचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे, तुमसर विधानसभा क्षेत्राचे आमदार राजू कारेमोरे यांची उपस्थिती होती. सत्काराच्या कार्यक्रमात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सहकार्य विष्णुदास लोणारे, उपाध्यक्ष चंद्रशेखर भीवगडे, कार्याध्यक्ष नितेश बोरकर यांच्यासह चंद्रकलाताई भोपे आणि कविता लोणारे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

पालकमंत्र्यांनी संविधानाचे महत्व आणि समाजातील अंधश्रद्धा निर्मूलनाच्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी त्यांचे आभार मानले

# रिटेवाडी उपसा सिंचन योजनेसाठी ३ फेब्रुवारीला मंत्रालयात बैठक

**सोलापूर । प्रतिनिधी**

प्रस्तावित रिटेवाडी उपसा सिंचन योजनेचा सर्वे तातडीने होऊन योजना गतीने पूर्ण व्हावी यासाठी येत्या ३ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १ वाजता मंत्रालयात स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी पत्रकार परिषदेत दिली.



याबाबत अधिक माहिती देताना बागल म्हणाले की, १६ जानेवारी २०२५ रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना लेखी पत्राद्वारे रिटेवाडी उपसा सिंचन योजनेसंदर्भात सर्वे तातडीने पूर्ण करण्याची विनंती केली होती. या पत्राची दखल घेत विखे पाटील यांनी मंत्रालयीन पातळीवर बैठक बोलावली आहे.

या बैठकीस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे तसेच जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीमुळे रिटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या कामाला गती मिळेल, असा विश्वास दिग्विजय बागल यांनी व्यक्त केला.

# सुपणवर वस्ती शाळेत सुपणवर यांच्या स्मृतिदिनानिमित्त खाऊ वाटप व सेंद्रिय शेतीवर मार्गदर्शन



**सोलापूर । प्रतिनिधी**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान संचलित श्री संत ज्ञानेश्वर माऊली गोशाळा, खांबेवाडी यांच्या वतीने समाजसेवक ह. भ. प. वै. विठ्ठल आबा सुपणवर यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त जि. प. शाळा, आयोध्या नगर सुपणवर वस्ती शाळेमध्ये शालेय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण, वृक्षारोपण व विद्यार्थ्यांचा सत्कार अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना संकेत कोळपकर यांनी सेंद्रिय शेतीचा पर्याय आवश्यक असल्याचे सांगितले. रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा अतिवापर केल्याने कॅन्सरसारखे आजार वाढले असून जमिनीचा पोतही खराब झाल्याचे त्यांनी नमूद केले. विषमुक्त शेतीसाठी गोमूत्र, शेणखत, गोकृपा जीवामृत यांचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी गावातील गुणवान विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उप अभियंता पदावर नियुक्ती झालेल्या अलंकार भगवान वाघमोडे यांचा विशेष सत्कार संस्थेच्या वतीने व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. कार्यक्रमाला आबासाहेब मोटे, विजय वाघमोडे, सुनील वाघमोडे, अक्षय लांडगे, पृथ्वीराज कांबळे, लहू लांडगे, अंकुश लांडगे, चंद्रकांत कांबळे, दत्तात्रय सुपणवर, आकाश वाघमोडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार संस्थेचे अध्यक्ष ह. भ. प. आण्णासाहेब सुपणवर यांनी मानले.

विठ्ठल आबा सुपणवर यांनी लोककल्याणासाठी आपले आयुष्य समर्पित केले. सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांचा सक्रिय सहभाग होता. ते पंढरपूरचे वासकर महाराजांचे पाईक शिष्य होते आणि आषाढी-कार्तिकी पायी दिंडीत सहभागी होऊन परमार्थ साधला होता

# भद्रावती तहसील कार्यालयात फार्मर आयडी प्रमाणपत्राचे वितरण

**भद्रावती । प्रतिनिधी**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमीत्ताने तहसिल कार्यालय भद्रावती येथे तहसीलदार राजेश भांडारकर यांचे हस्ते चोरा येथील शेतकरी वनवास धनपाल शेंडे व खोकरी, सागरा, मासळ तसेच परिसरातील अन्य शेतकरी बांधव यांना केंद्र शासन व राज्य शासनाच्या ऍग्रिस्टाक योजनेअंतर्गत फार्मर आय डी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. केंद्र व राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला ऍग्रिस्टॅक संकल्पनेच्या शेतकरी ओळखपत्र क्रंमाक निर्मिती प्रक्रियेत गतिमान करयासाठी आना शासनाच्या ऍग्रिस्टॅक सुकाणू समितीने दि. ०९/०१/२५ रोजी संपूर्ण राज्यात नागरी सुविधा केंद्र (उडउ) ची मदत घेऊन शेतकरी ओळख क्रंमाक निर्मितीचा निर्णय घेतलेला आहे. शेतक-यांच्या फायदयाचा असा हा प्रकल्प आहे. यापुढे प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ दयायचा असेल तर शेतकरी




ओळख कंमाक आवश्यक आहे. केंद्रशासन व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक हा मूलभूत घटक राहणार आहे. शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप, तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना मिळवणारी नुकसान भरपाईची अनुदानाची रक्कम याच विशिष्ट ओळखपत्र फार्मर आय डी च्या माध्यमातून मिळणार आहे. भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमीत्ताने तहसिल कार्यालय भद्रावती येथे ऍग्रिस्टॅक योजने अंतर्गत चोरा येथील शेतकरी श्री वनवास धनपाल शेंडे तसेच परिसरातील अन्य शेतकऱ्यांना तहसीलदार राजेश भांडारकर यांचे हस्ते फार्मर आय डी शेतकरी विशिष्ट ओळखपत्र क्रमांक प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रमाला नायब तहसिलदार मनोज आकनूरवार, राहुल राऊत, सुधीर खांडरे, नायब तहसीलदार पठाण तहसील कार्यालयाचे कर्मचारी तसेच तालुक्यातील शेतकरी बांधव तथा प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# तालुकास्तरीय बाल क्रीडा सांस्कृतिक महोत्सवाच्या कार्यक्रम पत्रिकेत राज शिष्टाचाराचे उल्लंघन केल्याने नागरिक आक्रमक

## कार्यक्रम पत्रिकेची बीडीओंच्या दालनापुढे होळी करून निषेध

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुक्यात नुकतंच बीटस्तरीय शालेय बालकिडा व सांस्कृतिक कार्यक्रम विविध बिटांतर्गत शाळेत पार पडले.त्यातून काही शाळांची तालुकास्तरावर निवड झाली.जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सोनापूर(देश)येथे तालुकास्तरीय शालेय बाल क्रीडा सांस्कृतिक महोत्सव दिनांक २७ जानेवारी ते २९ जानेवारी आयोजित करण्यात आला आहे. तालुकास्तरीय कार्यक्रमाची पत्रिका काढतेवेळी प्रशासना तर्फे जाणून-बुजून हेतू पुरस्पर राजशिष्टाचार पायदळी तुडवून परिसरातील सरपंच,उपसरपंच व पदाधिकारी यांना डावलून भारतीय जनता पार्टीशी संबंधित असणाऱ्या राजकीय पुढार्यांचे नाव टाकलेले आहे असा आरोप परिसरातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी करत कार्यक्रमाची पत्रिका बीडिओच्या दालनापुढे जाळून होळी करून दि.२५ शनिवारी निषेध नोंदवला .



राजशिष्टाचार न पाडल्याने कार्यक्रमाची पत्रिका तात्काळ बदलवावी अन्यथा मोठ जण आंदोलन उभारू असा इशारा सरपंच देविदास सातपुते,सरपंच रेचनकर,सरपंच धीरेंद्र नागापुरे, सरपंच विनोद जगताप, उपसरपंच साईनाथ को, सदस्य अशोक रेचनकर,उपसरपंच बालाजी चणकापुरे,प्रवीण लोखंडे,नामदेव सांगळे,विनोद नागापुरे,गौतम झाडे यांनी दिला.

**कार्यक्रमाच्या पत्रिकेसंबंधी तक्रार प्राप्त झाली आहे वरिष्ठांशी बोलून यातून काहीतरी मार्ग काढण्यात येईल**
**– गटशिक्षण अधिकारी समाधान भसारकर**

**वेडगाव येथील बकऱ्या राखणाऱ्या कार्यकर्त्यांचा प्रमुख पाहुण्यांत नाव टाकण्यात आला मात्र वेडगावच्या सरपंचांना चक्क पत्रिकेतून डावलण्यात आले हा सरपंचाचा अपमान आहे त्यामुळे तात्काळ ही पत्रिका बदलावी अन्यथा मोठे जन आंदोलन उभारू.**
**देविदास सातपुते सरपंच पोळसा**

# अंजली दमानिया यांनी घेतली अजित पवारांची भेट;धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची केली मागणी, सर्व पुरावे केले सुपूर्द

**मुंबई (वृत्तसंस्था)**

बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा वाल्मीक कराडला अटक करण्यात आली आहे. मात्र आता धनंजय मुंडे यांचा देखील राजीनामा घेण्यात यावा अशी मागणी केली जात आहे. याच संदर्भात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची देवगिरि बंगल्यावर जाऊन भेट घेतली आहे.

अंजली दमानिया यांनी सर्व पुरावे अजित पवारांना दाखवले आहे. सर्व पुरावे बारकाईने बघून अजित पवार यांनी मंगळवारी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन यावर चर्चा करून योग्य तो निर्णय घेईल, असे अजित पवार यांनी आश्वासन दिले असल्याची माहिती अंजली दमानिया यांनी दिली आहे.

धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचे कसे संबंध आहेत, त्यांच्यातील आर्थिक व्यवहार या सर्व गोष्टींचे पुरावे अंजली दमानिया यांनी अजित पवार यांना दिले आहेत. तसेच धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे. तसेच एवढे पुरावे बघून देखील जर कारवाई नाही झाली तर मी टोकाची भूमिका घेईल, असा इशारा देखील अंजली दमानिया यांनी दिला आहे.

अजित पवार यांच्या भेटीनंतर अंजली दमानिया यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या, जवळ जवळ २५ ते ३० मिनिटे आमची भेट झाली. त्यांचे म्हणणे आहे की बीडमध्ये जे काही झाले आहे त्याचे मी अजिबात समर्थन करत नाही. मग माझे तेच म्हणणे आहे की तुम्ही राजीनामा का घेत नाही. तुम्ही पुरावे म्हणत होतात न, मी सगळेच्या सगळे पुरावे घेऊन त्यांना भेटायला गेले आणि आज मी त्यांना दाखवले की कसे धनंजय मुंडे, राजश्री मुंडे आणि वाल्मीक कराड यांचे एकत्र बिझनेस कसे आहेत, त्यांच्या कंपन्यांमध्ये आर्थिक तफा कसा मिळत आहे आणि कसे हे ऑफिस ऑफ प्रॉफिटमध्ये बसत आहे. म्हणून तुम्ही कुठल्याही परिस्थितीत त्यांचा राजीनामा घेतला पाहिजे.




अंजली दमानिया म्हणाल्या, यासाठी मी त्यांना मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स यांनी जे डायरेक्शन दिले होते आमदार आणि मंत्र्यांसाठी ते दाखवले. कुठलाही आमदार किंवा मंत्री स्वतःसाठी किंवा त्यांच्या घरच्यांसाठी आर्थिक नफा मिळवू शकत नाही. त्यात महाजेनको कडून यांना कसा नफा मिळत आहे हे पेपर्स दाखवले, त्यानंतर त्यांना मी त्यांची असलेली दहशत आणि त्यांचे असलेले सो कॉल्ड समर्थक जे समर्थक नाहीत पण ते दहशतवादी आहेत. त्यांनी अक्षरशः बीडमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात बीडमध्ये दहशत केली आहे त्याचे सगळेच्या सगळे फोटो रील हे सगळे त्यांनी शांतपणे बघून घेतले आणि त्यांनी असे सांगितले की उद्या त्यांची आणि मुख्यमंत्र्यांची बैठक होणार आहे त्यात मी जी काही कागदपत्रे दिली आहेत त्यावर दोघांमध्ये चर्चा होईल आणि त्यानंतर पुढचा जो निर्णय आहे ते घेतील.

अंजली दमानिया म्हणाल्या, मला खात्री आहे की लोकांची भावना आहे, जनतेचा आक्रोश आहे आणि त्याव्यतिरिक्त खरेच जे कृत्य केले गेले ते इतके निर्घुण होते की महाराष्ट्रात कोणीही कुठेही थारा देऊ नये म्हणूनच आपला लढा आहे हे देखील मी अजित पवारांना सांगितले आणि त्यांचे देखील तेच मत होते की असे यापुढे कधीही होऊ नये. संतोष देशमुख यांच्यासोबत जे झालेले कृत्य आहे असे परत महाराष्ट्रात घडू ने म्हणून मी म्हंटले की धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे गरजेचे आहे. उद्या मुख्यमंत्र्यांना मी हे सगळे कागदपत्रे दाखवतो आणि योग्य तो निर्णय घेऊ, एकत्रितपणे निर्णय घेऊ असे अजित पवार यांचे म्हणणे आहे, आता बघूयात ते काय निर्णय घेतात.

# राजकीय वर्तुळातून धक्कादायक घटना

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या पक्षाचे पदाधिकारी अशोक धोडी सात दिवसापासून बेपत्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण ताजे असतानाच आता पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील राजकीय वर्तुळातून धक्कादायक घटना समोर आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे पदाधिकारी असलेले अशोक धोडी हे मागील आठ दिवसापासून बेपत्ता आहेत. पोलिसांनी धोडी यांचा सर्वत्र शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांचा अद्याप कुठेही थांगपत्ता लागलेला नाही. अशोक धोडी अचानक गायब झाल्याने स्थानिकांकडून त्याचे वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत. तर त्यांचे अपहरण झाले असल्याचा संशय धोडी यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे.

अशोक धोडी हे शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी आहेत. त्यांनी विधानसभा निवडणुकीत देखील डहाणू विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक म्हणून काम केले होते. मात्र राजकीय पक्षात असलेले धोडी हे मागील आठ दिवसापासून बेपत्ता आहेत. त्यांचे अपहरण झाले असल्याचा संशय त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. २० जानेवारी रोजी अशोक धोडी यांनी आपल्या पत्नीला फोन करून डहाणू येथून घरी येत असल्याचे सांगितले होते. मात्र त्यानंतर त्यांचा फोन बंद झाला आणि त्यानंतर ते कोणाच्याही संपर्कात नाहीत. तेव्हापासून ते बेपत्ता झाले आहेत.

फोन आल्यानंतर प्रतीक्षा करून देखील धोडी हे घरी आले नाही. तसेच त्यांचा फोन बंद येत असल्याने कुटुंबीयांनी पोलिस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली. आता या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना अपहरण करून गुजरातमध्ये नेल्याचा संशय व्यक्त केला आहे. धोडी यांचे अपहरण करण्यामागचे कारण काय असू शकते? याचा तपास आता पोलिस घेत आहेत. वास्तविक अशोक धोडी हे महाराष्ट्र गुजरात सीमा प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करत होते. त्यामुळे त्यांच्या अपहरणामागे राजकीय षडयंत्र आहे का? याचा तपास पोलिसांकडून घेतला जात आहे.

यादरम्यान धोडी यांच्या कारचे सीसीटीव्ही फुटेज देखील व्हायरल होत आहे. इतकेच नाही तर अशोक धोडी यांच्या कारचे वेवजी डोंगरी जवळ काचा देखील पोलिसांना सापडल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणी अपहरण झाल्याचा संशय आणखीनच बळावला आहे. धोडी यांच्या कारचे एक सीसीटीव्ही व्हिडिओ देखील आता समोर आले आहे. मात्र, या प्रकरणातील पोलिसांनी तपासाची चक्रे ही वेगाने फिरवावी अशी मागणी होत आहेत.

# सात्रळ महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचा उत्साहात समारोप

**सात्रळ । प्रतिनिधी**




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सात्रळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२४-२०२५ चा समारोप श्रीक्षेत्र धानोरे घाट येथे शनिवार, २५ जानेवारी रोजी उत्साहात संपन्न झाला.

समारोप कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव शिंगोटे यांनी प्रास्ताविक केले. शिबिरातील कार्याचा अहवाल कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहिदास भडकवाड यांनी सादर केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवरा सहकारी बँकेचे संचालक प्रा. बाळासाहेब दिघे पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून ड. बाळकृष्ण चोरमुंगे पाटील, ड. आप्पासाहेब दिघे पाटील, रमेश पन्हाळे, सुभाष अंत्रे, जयवंत जोर्वेकर, व अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रा. बाबा खरात यांनी शिबिरातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्रमसंस्कारातून राष्ट्रनिर्माण हे राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य ध्येय असल्याचे सांगितले. शिबिरादरम्यान निस्वार्थ समाजसेवेतून सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडते, असे त्यांनी प्रतिपादन केले.

सात दिवसांच्या शिबिरात ग्रामस्वच्छता, नवमतदार जनजागृती, वृक्षारोपण, डिजिटल साक्षरता, व्यक्तिमत्त्व विकास, अक्षय ऊर्जा जनजागृती, समाजप्रबोधनपर पथनाट्य, सेंद्रिय शेतीचे महत्त्व, आरोग्य तपासणी, व्याख्यानमाला, आणि बौद्धिक खेळ अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. सोपानराव शिंगोटे, उपप्राचार्या डॉ. जयश्री सिनगर, डॉ. दीपक घोलप, व अन्य सहकारी प्राध्यापक व सेवक वृंदांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भाऊसाहेब नवले यांनी केले तर प्रा. डॉ. निलेश कान्हे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# श्री मुलिकादेवी विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**पारनेर । सुयश नरसाळे**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निघोज (ता. पारनेर) येथील श्री मुलिकादेवी विद्या मंदिर विद्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.




ध्वजारोहण विद्यालयाच्या प्राचार्या मनिषा जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ग्राम महसूल अधिकारी मोहिनी देशमुख होत्या. यावेळी उपप्राचार्य कचरु शिंदे, पर्यवेक्षक संतोष इंगळे, उच्च माध्यमिक विद्यालयाचे समन्वयक किरण पाडळकर, आप्पाशेठ वराळ, तसेच पत्रकार सचिन जाधव उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनानिमित्त लेझिम पथकासह प्रभातफेरी काढून 'झाडे लावा, झाडे जगवा' आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी नृत्य, भाषण यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

प्राचार्या मनिषा जगदाळे यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व पटवून देत मार्गदर्शन केले. शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्रे व रोख बक्षिस देऊन सन्मान करण्यात आला.

सांस्कृतिक कार्यक्रमात 'गजानना गणराया,' 'नटरंग उभा,' 'वतन याद रहेगा,' 'ऐ मेरे वतन के लोगो,' यांसारखी देशभक्तिपर गीतं तसेच प्रबोधनपर नाटिका सादर करण्यात आल्या.

कार्यक्रमाला दारकू खोडदे, दादा ठवाळ, धनंजय खोसे, सुनिल औटी, अमोल खिलारी, सबाजी बेलोटे, सुधीर धानापुणे, संगिता दिघे, तसेच इतर मान्यवर, पालक व सेवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुष्पा वराळ, ज्योती पोटे, प्रिया लहारे आणि मेहबूब इनामदार यांनी केले, तर आभार प्रदर्शन धनंजय खोसे यांनी मानले.

# श्रीपूर ते नेवरे रस्त्याच्या निकृष्ट कामाची चौकशीची मागणी

**माळशिरस । प्रतिनिधी**



श्रीपूर, सेक्शन १५ ते नेवरे या ५ किमी रस्त्याच्या ४ कोटी रुपयांच्या सुधारणा कामात निकृष्ट दर्जाची गुणवत्ता असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. या कामासाठी माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या प्रयत्नातून मंजुरी मिळाली होती, परंतु काम अत्यंत खालावलेल्या दर्जाचे असल्याचा आरोप होत आहे.

ठेकेदार अमित कन्स्ट्रक्शन यांच्या कामाबाबत समाजसेवकांनी नाराजी व्यक्त केली असून, तक्रार करणाऱ्यांना दमदाटी होत असल्याचा आरोप आहे. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात ऊस वाहतूक होत असल्याने रस्त्याचे नुकसान झाले असून नागरिकांना मणक्याचे आजार व स्थलांतराचा त्रास सहन करावा लागत आहे.सुमित भोसले यांनी उपअभियंता संयम कास्ते यांच्याकडे तक्रार करत काम थांबवण्याची मागणी केली, मात्र त्यांच्या प्रतिसादामुळे प्रशासनावरील संशय वाढला आहे.नागरिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून रस्त्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी केली आहे.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त एकता युवा मंडळाकडून बिस्कीट व शीतपेय वाटप



**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने एकता युवा मंडळ, सिंदी रेल्वेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसह नागरिकांना बिस्कीट आणि शीतपेय वाटप करण्यात आले. बाजार चौकात एकत्र आलेल्या सुमारे २००० विद्यार्थ्यांना तसेच सोहळा पाहण्यासाठी जमलेल्या सिंदीवासीयांना या उपक्रमाचा लाभ मिळाला. यावेळी मंडळाचे सदस्य नरेंद्र पेटकर, राजु तेलरांधे, जमिल खान, सुभाष तळवेकर, नरेंद्र कठाणे, रमाकांत बोकडे, आशिष पालीवाल, ललित बेताला, हेमंत सोनटक्के, तुषार ठोंबरे, महेश राऊत, रविंद्र ढोबळे, नरेंद्र पटेल, भूपेश देवतळे, सचिन मोरस्कर, आनंद बिस्वास, शकील शेख, देवा पडवे, सुनील रेवतकर, रोशन तडस, पिंटू टेंभरे, संजय मुडे, कवडू म्हैसकर, जगदिश बोरकुटे, वसंता सिरसे, अजीम शाह, मंगेश मुंदडा, पुरुषोत्तम व्यास, रवी मुंदडा, रूपेश सारवान, संदिप दुम्पलवार, रविंद्र सागरकर, सतीश ढोक, भूपेश, गजु ढेकण, राजु उरकुडकर, गणेश मोरस्कर, शालीक उरकुडे आदी उपस्थित होते.

# सिंदी शहरात भाजपा महिला मोर्चाचा मकर संक्रांती मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

## दोन हजार महिलांचा उस्फूर्त सहभाग

### भाजपा महिला मोर्चाच्या सरिता गाखरे व श्रद्धा कुणावार यांची उपस्थिती

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**




भाजपा महिला मोर्चाच्या वतीने शिवप्रेम सभागृहात काल, २६ जानेवारी रोजी मकर संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू व सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दोन हजार महिलांनी सहभाग घेतला. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार समीर कुणावार, त्यांची पत्नी श्रद्धा कुणावार, व भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव सरिता गाखरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात समीर कुणावार व श्रद्धा कुणावार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष वैशाली येरावार, उपाध्यक्षा छाया सातपुते, महिला मोर्चाच्या महामंत्री अनिता मावळे, विधानसभा प्रमुख नलिनी सयाम, माजी नगराध्यक्ष बाबीता तुमाने, शशीकला क्षीरसागर, वैशाली पेटकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी समीर कुणावार म्हणाले, महिलांच्या सक्षमीकरणासाठी आयोजित या कार्यक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल मी मनःपूर्वक आभार मानतो. महिलांच्या हक्कांसाठी आणि कल्याणासाठी आम्ही नेहमीच कटिबद्ध राहू, याची ग्वाही देतो. आजचा दिवस माझ्या आयुष्यात संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे संचालन पुष्पलता वडाद्रे यांनी केले, तर प्रस्तावना रोशणा पेटकर यांनी सादर केली. आभार भाजपा जिल्हा सचिव स्नेहल कलोडे यांनी मानले.

# मुस्लिम दफनभूमी रस्त्यासाठी आमदार निधीतून दहा लाखांची मागणी

**सोलापूर । प्रतिनिधी**



करमाळा शहरातील मुलाणी मुस्लिम दफनभूमी येथील रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यासाठी आमदार नारायण आबा पाटील यांच्याकडे आमदार निधीतून दहा लाख रुपये मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात मुस्लिम समाजाचे करमाळा अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष फारुक जमादार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर नालबंद, आयेशा मस्जिदचे साजिद बेग, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष सोहेल पठाण, अशपाक सय्यद, अलीम खान, युवा नेते अल्लाउद्दीन शेख, इनुस पठाण आदींनी आमदार नारायण आबा पाटील यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद केले आहे की, मुलाणी मुस्लिम दफनभूमीकडे जाण्यासाठी सध्या रस्ता नसून झाडेझुडपे वाढल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तातडीने रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी आमदार निधीतून निधी मंजूर करून दफनभूमी रस्त्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी संबंधितांनी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी त्वरित उपाययोजना होण्यासाठी सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

# कै.नामदेवराव जगताप यांच्या स्मृतिदिनानिमित्त उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप



**सोलापूर । प्रतिनिधी**

कै. नामदेवराव जगताप यांच्या स्मृतिदिनानिमित्त उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करताना नामदेवराव जगताप यांच्या सामाजिक कार्याचा व सेवाभावी वृत्तीचा उल्लेख उपस्थित मान्यवरांनी केला. त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहत समाजसेवेची परंपरा पुढे नेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमात शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी नामदेवराव यांच्या योगदानाचे महत्त्व विषद केले. स्थानिक ग्रामस्थ व मान्यवरांच्या उपस्थितीत हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी प्रा. महेश पाणसे यांची निवड

**मुल । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी प्रा. महेश पाणसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या



संघटन कौशल्याची दखल घेऊन संघटनेचे संस्थापक राज्य संघटक संजय भोकरे यांच्या शिफारशीनुसार ही महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी प्रा. पाणसे यांच्या नियुक्तीबाबत मत व्यक्त करताना संघटनेच्या विकासासाठी त्यांच्या योगदानाचे कौतुक केले. यापूर्वी त्यांनी चंद्रपूर जिल्हाध्यक्ष आणि विदर्भ विभागीय अध्यक्ष म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. येत्या ३ फेब्रुवारी २०२५ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती येथे संघटनेचा भव्य रजत महोत्सव होणार असून, त्याचे नेतृत्व प्रा. महेश पाणसे करतील. प्रा. पाणसे यांच्या नियुक्तीमुळे पत्रकार संघटनेच्या सर्व स्तरांवर आनंद व्यक्त होत असून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# सारनाथ माध्यमिक निवासी विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा



**गंगाखेड । प्रतिनिधी**

शालिग्राम शिक्षण व समाजकल्याण संस्था संचलित सारनाथ माध्यमिक निवासी विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष संभाजी पंचांगे आणि कर्मचारी वाघमारे, बंडे, कांबळे यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

# सिंदी(रेल्वे)येथे जय बजरंग क्रीडा मंडळाच्या वतीने कबड्डी स्पर्धेचे भव्य आयोजन

## आमदार समीर कुणावार यांच्या हस्ते उद्घाटन

## ४२ नामवंत संघांचा उत्स्फूर्त सहभाग




**हिंगणघाट । प्रतिनिधी**

सिंदी (रेल्वे) येथील जय बजरंग क्रीडा मंडळाच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त भव्य एकदिवसीय कबड्डी सामन्याचे आयोजन करण्यात आले. उपरोक्त सामन्याचे उद्घाटन २६ जानेवारी रोजी वानरदेव मंदिराच्या मैदानावर आमदार समीर कुणावार यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. उद्घाटन प्रसंगी ठाणेदार संतोष दरेकर, भाजपा शहराध्यक्ष ओम राठी, ज्येष्ठ नेते सुधाकर घवघवे, माजी नगरसेवक अखिल शेख, राजू साखरकर, अजया साखळे, अनिल साखळे, गणेश काळबांडे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील ४२ नामवंत कबड्डी संघांनी सहभाग नोंदवला असून, सामन्यांना प्रेक्षकांनी भरघोस प्रतिसाद दिला. जय बजरंग क्रीडा मंडळाच्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील कबड्डी खेळाडूंना व्यासपीठ मिळाले असून, स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडत आहे.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन जय बजरंग क्रीडा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले असून, त्यांचे स्थानिक स्तरावर कौतुक होत आहे.

# झोडेगावच्या आशा सेविका सपना बेडवाळ यांना राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार

**गंगापूर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील झोडेगाव येथील रहिवासी आणि आशा सेविका म्हणून काम करणाऱ्या सपना सुभाष बेडवाळ यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत राज्य मराठवाडा संघ, महाराष्ट्र यांच्याकडून राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.



सपना बेडवाळ यांनी कोरोना काळात केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे गाव कोरोना मुक्त होण्यात मोलाची भूमिका बजावली होती. त्यांनी स्वच्छतेसाठी जनजागृती मोहीम राबवली तसेच आरोग्य सेवांमध्ये महत्त्वाचा वाटा उचलला. या कार्यासाठी त्यांना वडिलांकडून प्रेरणा मिळाली असून, त्यांची कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभावी वृत्ती समाजासाठी प्रेरणादायी ठरली आहे.

हा पुरस्कार त्यांना लवकरच सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार असून, त्यांच्या या सन्मानामुळे झोडेगाव आणि जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे.

# अलिबाग लोधिवली येथील शिवमंदिरात चांदीच्या नागाची मूर्ती चोरी

**रायगड । प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील लोधिवली गावातील शिवमंदिरातून चांदीची नागाची मूर्ती चोरीस गेल्याची घटना घडली आहे. चोरी झालेल्या मूर्तीची किंमत अंदाजे सहा हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे.

ही घटना १९ जानेवारी रोजी साडेअकराच्या सुमारास घडली. फिर्यादी पूजा करत असताना अज्ञात चोरट्याने मंदिराचे दरवाजाचे कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला आणि शिवपिंडीवर बसवलेली चांदीची नागाची मूर्ती चोरून नेली.

याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक जुंदरे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. चोरीमुळे गावकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांकडून आरोपींचा शोध घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# शेख एम.एन.यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार जाहीर

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील दहेगाव येथील कै. दादासाहेब पाटील पब्लिक



स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य शेख एम. एन. यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. प्राचार्य शेख यांनी आपल्या कार्यकाळात शाळेच्या शिस्तीची प्रभावी अंमलबजावणी, शाळेची स्वच्छता, परिसराचे डेकोरेशन, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, मुलांसाठी खेळाचे गार्डन, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी मोठा हॉल यांसारख्या सुविधांचा विकास केला आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे शाळेचा स्तर उंचावला आहे. ९ फेब्रुवारी रोजी या पुरस्काराने त्यांचा सन्मान केला जाणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षक व सहकाऱ्यांनी अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# कोरडगावमध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**पाथर्डी । प्रतिनिधी**

कोरडगाव (ता. पाथर्डी) येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सरपंच रविंद्र भोरु म्हस्के यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यांनी संविधान रक्षणाचा संकल्प उपस्थितांना दिला.

ग्रामपंचायत, जिल्हा परिषद शाळा आणि न्यू इंग्लिश स्कूलमध्ये देशभक्तिपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गीते, नृत्ये आणि लघुनाट्य सादर केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. शेवटी सर्व उपस्थितांना चहा-नाश्ता देण्यात आला.

# जिल्ह्याच्या विकासाचा कृती आराखडा तयार करा-राधाकृष्ण विखे पाटील

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राज्याचे जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विकासाबाबत बैठक आयोजित करण्यात आली. राज्य शासनाच्या १०० दिवस कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्ह्याच्या विकासासाठी उपक्रम वेगाने राबवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीत जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांची उपस्थिती होती.



पालकमंत्र्यांनी सांगितले की, राज्यस्तरावर १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर जिल्ह्याचा विकास आराखडा तयार करून विकासकामांना गती द्यावी. गोदावरी घाट विकासाची कामे गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून हाती घेण्यात येणार आहेत.

त्यांनी पुढे सांगितले की, संत ज्ञानेश्वर महाराज सृष्टी प्रकल्प व अहिल्यादेवी होळकर स्मारकाचा प्रस्ताव तयार करावा. तसेच साहसी पर्यटनासाठी चंदनपुरी घाटाचा विकास व भंडारदरा येथे स्कुबा डायव्हिंगची शक्यता तपासून त्याचा प्रस्ताव तयार करावा.

१५ फेब्रुवारीपर्यंत विकासासाठी सादरीकरण तयार करावे व प्रत्येक विभागाने स्वतःचे विकास व्हिजन निश्चित करावे, असेही त्यांनी निर्देश दिले. सुपे येथील अतिक्रमण काढण्याच्या कार्यवाहीबाबतही त्यांनी सूचना दिल्या.जिल्ह्याच्या वैभवात भर घालणारी कामे गतीने करण्यासह नागरिकांच्या समस्या संवेदनशीलतेने सोडवण्याचा आग्रह त्यांनी धरला.

# समृध्दी महामार्गावर सेलडोह शिवारात डिझेलच्या काळाबाजारावर कार्यवाही, ८,६६,९२० रु. चा माल जप्त

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

समृध्दी महामार्गावर स्थित सेलडोह शिवारात पोलीसांनी डिझेलच्या काळाबाजारावर मोठी कार्यवाही केली. पोलीसांना मिळालेल्या माहितीनुसार, सिंदी पोलीस आणि महामार्ग पोलीस दलाने एकत्र येऊन २८/५०० येथे बंद स्थितीत असलेल्या आयसर गाडी क्रमांक एम.पी. ०९ जि. जि. ३२७६ ची पाहणी केली. पाहणीदरम्यान, गाडीमध्ये २४ प्लास्टिक कॅन आढळले, त्यापैकी १६ कॅनमध्ये डिझेल भरलेले होते. एकूण ६३० लिटर डिझेल जप्त करण्यात आले. यासह, गाडीसह एकूण ८,६६,९२० रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला.



सदर कार्यवाही पोलीस अधिक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधिक्षक डॉ. सागरकुमार कवडे, आणि उप विभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार संतोष दरेकर, पो.उप.नि. श्यामसुदर सूर्यवंशी, सफौ संजय भगत, पोहवा प्रफुल डफ, पोशि उमेश खामनकार, पोशि सचिन उईके, तसेच सुधिर बावणे, वैध व कोवरते महामार्ग पोलीस वर्धा यांच्या संयुक्त प्रयत्नाने करण्यात आली.

पोलीसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, तपास सुरू आहे

# जनावरांची बेकायदा वाहतूक करणारा टेम्पो पोलिसांनी पकडला

**शिरूर । रमेश बनसोडे**

वडगाव रासाई (ता. शिरूर) येथून करमाळा कडे जनावरांची बेकायदा वाहतूक करणारा टेम्पो पोलिसांनी सापळा रचून पकडला. रविकांत पांडुरंग माने, वडगाव रासाई याने स्वराज टेम्पो (क्र. एम.एच.१४ इ.एम.१०५०) मध्ये २२ म्हशीचे पारडी भरून, बबन ज्ञानदेव गिरमे यांच्या गोठ्यावर जात असताना पोलिसांना याबाबत खबऱ्यांमार्फत माहिती मिळाली. पोलीसांनी मांडवगण फराटा चौकात टेम्पो पकडला. यावेळी पोलिस हवालदार शिंदे, उबाळे, सहायक फौजदार कदम, तसेच प्राणीमित्र मिनीनाथ गव्हाणे, योगेश माचाले, सागर गव्हाणे, संजय गव्हाणे, अमोल चौगुले यांच्या मदतीने टेम्पो थांबवून पंचनामा केला. यावेळी, एका पारडीचा मृत्यू झाला व त्याची पशुवैद्यकीय तपासणी केली गेली.



पोलिसांनी २१ पारडी, एक टोणगा (रेडा) आणि ५ लाख रुपये किंमतीचा टेम्पो जप्त केला, ज्यांची एकूण किंमत ६,७२,००० रुपये आहे. जनावरांची वाहतूक करतांना वैद्यकीय तपासणी न करता, अधिक प्राण्यांना वाहून नेल्याबद्दल टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली मांडवगण फराटा पोलीस दुरक्षेत्र करीत आहेत.

# जुने बसस्थानक आणि नाली दुरुस्तीच्या मागणीसाठी आंदोलन स्थगित

**पाथर्डी । प्रतिनिधी**

जुने बसस्थानक येथे तात्काळ शौचालय बांधकाम आणि भानुप्रयागसमोरील तुटलेल्या नालीच्या दुरुस्तीसाठी दिलेल्या मागणीवर तोडगा निघाल्याने प्रस्तावित आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. श्री. अक्षय गोरक्ष वायकर यांनी २७ जानेवारी २०२५ पासून उपोषण करण्याचा इशारा दिला होता.





श्री. वायकर यांच्या नोटीसनुसार, बसस्थानक परिसरात शौचालय नसल्याने प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तसेच भानुप्रयागसमोरील तुटलेली नाली सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करत असल्याने त्वरित दुरुस्तीसाठी संबंधित विभागांनी कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली होती.२५ जानेवारी रोजी वायकर यांच्याशी झालेल्या चर्चेत, शौचालयाच्या बांधकामासाठी वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार सुरू असून, नाली दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला कळवण्यात आले आहे, असे आगार व्यवस्थापकांनी सांगितले.

या स्पष्टीकरणानंतर वायकर यांनी २७ जानेवारीपासून होणारे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

मात्र, शौचालयाचे काम २७ फेब्रुवारी २०२५ पर्यंत पूर्ण न झाल्यास २८ फेब्रुवारीपासून पुन्हा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वायकर यांनी दिला आहे. प्रशासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष देऊन समस्यांचे निराकरण करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# देवनिल विद्यालय टेकाडी येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**मुल । प्रतिनिधी**

विद्यासागर शिक्षण प्रसारक मंडळ, मुल द्वारा संचालित देवनिल विद्यालय टेकाडी येथे ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष देवरावजी भांडेकर, माजी आमदार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेश सावरकर, प्रतिष्ठित नागरिक अनिल बोमनवार, पालक रवि चौधरी, विनोद गोहणे, ईश्वर जराते, शरद गणवीर, अनिल जक्कुलवार, किसन गुरनुले, अनंता मोहुर्ले, विलास जक्कुलवार, प्रशांत जंपलवार, आणि वैशाली बोमनवार यांची उपस्थिती होती.




कार्यक्रमाच्या दरम्यान सामाजिक कार्यकर्ते आणि माजी विद्यार्थी मंगेश पोटवार, अध्यक्ष - तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी गरजू विद्यार्थ्यांना नोटबुक आणि पेन साहित्य वितरित केले.

कार्यक्रमाला आकाश येसनकर, रोहित कामडे, अंबादास राजनकर, नामदेव पिजदुरकर, गणेश श्रीरामे, मनोहर मडावी, वैशाली भांडेकर, रविंद्र तुपकर, पुरुषोत्तम खोबे, आत्माराम सुरजागडे, विनोद मंगाम, सचिन कोल्हटवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांनी सुयोग वसाके, प्रवज्जा रामटेके, सुजल बोलीवार, आणि पलक जराते यांचे मनोगत ऐकवले. तसेच विविध क्रीडा स्पर्धा, गणित संबोध परीक्षा आणि गाव हा विश्वाचा नकाशा या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशिला उडाण, तर संचालन समृद्धी नागोसे आणि आभारप्रदर्शन आर्या जक्कुलवार यांनी केले.

# बल्लारपूर पब्लिक स्कूल मुल येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**मुल । प्रतिनिधी**

२६ जानेवारी २०२५ रोजी, बल्लारपूर पब्लिक स्कूल मुल येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ मूलचे अध्यक्ष ॲड. अनिल वैरागडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून शशिकांत धर्माधिकारी, सचिव शिक्षण प्रसारक मंडळ, तसेच विशेष अतिथी म्हणून श्री हंसराज गजभिये व शाळेचे प्राचार्य श्री. विनोद बोलीवार उपस्थित होते.




कार्यक्रमात कुमारी दुर्गा कोटगले, शाळेच्या शैक्षणिक प्रभारी यांनी प्रास्ताविक भाषण दिले आणि प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी विविध नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिल्ड व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी तोशी जयस्वाल यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षिका करिष्मा लेनगुरे यांनी केले. शाळेचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमामुळे कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाची सांगता खाऊ वाटपाने व 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताने केली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .